# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (आस्थापना व प्रशासन विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./७२७३ /२०२१ दि. २३ /०९/२०२१

## अधिसुचना

गोंडवाना विद्यापीठाच्या स्थापनेला ०२ ऑक्टोंबर २०२१ रोजी १० वर्ष पूर्ण होत असून विद्यापीठ दशमानोत्सव वर्ष म्हणून साजरे करीत आहे. तद्वतच राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती, स्वातंत्र्याचा ७५ वा अमृतमहोत्सव तसेच विद्यापीठाचा दहावा वर्धापन दिन सोहळा साजरा करण्याचे योजिले असून कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर केंद्र व राज्य शासनाच्या तसेच जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शक सुचना व निर्देशांना अनुसरुन विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा. श्रीनिवास वरखेडी यांचे अध्यक्षतेखाली दि. ०२ ऑक्टोंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता महाराजा हॉल, सिटी हार्ट हॉटेलजवळ, धानोरा रोड, गडचिरोली येथे विद्यापीठाचा दहावा वर्धापन दिनाचा कार्यक्रम संपन्न होत आहे. सदर कार्यक्रमास **मा. ना. श्री. उदय सामंत, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य हे उद्घाटक म्हणून व मा. ना. श्री. विजय वडेट्टीवार, मंत्री, इमाव, बहुजन कल्याण विभाग, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन महाराष्ट्र राज्य तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री हे मुख्य अतिथी म्हणून लाभणार आहेत** तसेच या कार्यक्रमास विशेष अतिथी व प्रतिष्ठित मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

या शुभ प्रसंगी उपस्थित प्रमुख मान्यवरांच्या हस्ते जीवन साधना गौरव पुरस्कार मा. डॉ. तुलसीदास विठूजी गेडाम, तळोधी (बाळापूर) यांना प्रदान करुन गौरविण्यात येणार आहे. विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक व कर्मचारी तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याकरीता विद्यापीठामार्फत उत्कृष्ट पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत तसेच गोंडवाना विद्यापीठात सेवा देऊन मोलाचे योगदान व सहकार्य केलेल्या माजी कुलगुरु तसेच माजी प्र-कुलगुरु यांचा सत्कार करण्यात येणार आहे व गोंडवाना विद्यापीठाकडून रुग्णांच्या सेवेकरीता गडचिरोली येथील शासकीय जिल्हा सामान्य रुग्णालयास जीवन समर्थन प्रणालीयुक्त रुग्णवाहीका भेट देऊन लोकार्पण करण्यात येणार आहे. तसेच विद्यापीठाच्या दशमानोत्सव निमित्याने दि. ०३ ऑक्टोंबर ते ०६ ऑक्टोंबर, २०२१ दरम्यान विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक व ग्रंथपाल यांचेकरीता विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

करीता सर्व संबंधितांना याद्वारे अधिसुचित करण्यात येत आहे.

२३/९/२०२१
**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. सन्माननिय सदस्य, सर्व प्राधिकरणे, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू अधिसुचना कृपया, आपल्या अधिनस्त अधिकारी, शिक्षक, कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्या माहितीकरीता निदर्शनास आणून द्यावे.
५. मा. सर्व शैक्षणिक तसेच प्रशासकीय विभाग प्रमुख/युनिट प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू अधिसुचना कृपया, आपल्या अधिनस्त अधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांच्या माहितीकरीता निदर्शनास आणून द्यावे.
६. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
७. आस्थापना व प्रशासन विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)** २३-९-२०२१
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली